## दिनांक 08/04/2025

1 खोपोली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 22/03/2025 रोजी 10:30 वा ते दि. 23/03/2025 रोजी 10:30 वा च्या दरम्यान मौजे गगनगिरी मठ खोपोली ता.खालापुर येथे महिला फिर्यादी रा.. रूम नं.1405, चौदावा माळा, नवशिवनेरी बिल्डींग नं.02, अमर सिनेमा समोर, वा.तु.पाटील मार्ग, गोवंडी मुंबई यांना त्यांचा मोबाईल नंबर वर अज्ञात आरोपीत याने त्याचा मोबाईल नंबर या वरून फिर्यादी यांना फोन करून बॅंक ऑफ महाराष्ट्राचे असलेले मॅनेजर बोलत असल्याचे भासवुन खोटे सांगुन, फिर्यादी यांचे बॅंक ऑफ महाराष्ट्रामध्ये असलेले खाते क्रमांक याची के.वाय.सी करावी लागेल असे खोटे सांगुन, फिर्यादी यांना त्यांच्या व्हॉटसअपवर खोटा ए.पी.के. अँप पाठवुन त्यामध्ये त्यांची वैयक्तीक माहिती भरण्यास सांगुन ती माहिती फिर्यादी यांचेकडुन प्राप्त करून घेवुन, फिर्यादी यांचे बॅंक ऑफ महाराष्ट्राचे चे खाते क्रमांक मधील एकुण 5,00,000/- रूपये रक्कम (पाच लाख रुपये रक्कम) स्वतःचे फायदयाकरीता फिर्यादीचे परवानगी शिवाय लबाडीचे उद्देशाने काढुन घेवुन फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे गुरनं.97/2025, भारतीय न्याय संहीता कलम 318(4)प्रमाणे प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई श्री.अभिजित व्हरांबळे, हे करीत आहेत.

2. पेण पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 01/04/2025 रोजी 05:00 वा च्या सुमारास मौजे दर्शन बिजनेस पार्क बिल्डीग क्रंमाक 1 समोरिल पेण धरमतर रोडचे बाजुला पेण शहरातील कमानी जवळ ता.पेण येथे कोणीतरी अज्ञात इसमाने एकूण 25,000/-रुपये किंमतीची स्कुटी ही फिर्यादीच्या संमतीशिवाय स्वतःचे फायदयाकरिता चोरुन नेली.

याबाबत पेण पोलीस ठाणे गुरनं.66/2025, भा.न्या.सं.2023 चे कलम 303(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/म्हात्रे हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 07.04.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 191 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 1,94,500/-रुपये इतका दंड आकारला आहे.